# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला -४४४१०४ निम्न कृषि शिक्षण

प्रा. डि. बी. तामगाडगे फोन नं. ०७२४ २२५८७०६ सहयोगी अधिष्ठाता


---

क्र.सअ/निकृशि/मु.वा.प्रवेश/३८७/२०१४
निम्न कृषि शिक्षण, डॉ. पंदेकृवि, अकोला,
दिनांक : १०.०९.२०१४.

प्रति.

प्राचार्य
घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालय (सर्व),
_____________________ प्राचार्य
खाजगी कायम विनाअनुदानित कृषि तंत्र निकेतन (सर्व),
_____________________
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला कार्यक्षेत्र

द्वारा :– विद्यापीठाचे संकेतस्थळ www.pdkv.ac.in

विषय :– सन २०१४–२०१५ या शैक्षणिक वर्षाची कृषि तंत्र विद्यालय/निकेतन पदविका प्रवेशाची वाढीव स्पॉट प्रवेश फेरी राबविण्याबाबत.

संदर्भ :– पत्र जा.क्र.:मकृप/शिक्षण–१/२२१४/२०१४ दिनांक ०९.०९.२०१४.

वरील संदर्भांकित प्रवेश सुचनेनुसार स्थळ प्रवेश (Spot admission) प्रक्रिया दि. ०६.०९.२०१४ रोजी संपलेली आहे. परंतु सद्याच्या प्राप्त अहवालानुसार फक्त ६०:% जागा भरलेल्या आहेत व सद्यस्थितीत बऱ्याच ठिकाणी रिक्त जागा राहल्या आहेत.

यापूढील प्रवेश फेरी दि. १०.०९.२०१४ रोजी प्रवेश सोडून गेलेल्या किंवा रिक्त राहिलेल्या जागेकरिता केटीपीएलची अंतिम गुणवत्ता यादी (दि. ०४.०९.२०१४ रोजी प्रसिध्द झालेली) वापरायची आहे. परंतु यादीमध्ये उमेदवारांची संख्या नगण्य असल्यामुळे ज्या उमेदवाराने केटीपीएलकडे अर्ज भरलेलाच नाही आणि प्रवेश घेवू इच्छितात अश्या उमेदवारांसाठी वाढीव स्पॉट ॲडमिशन फेरी जागा शिल्लक असल्यास (जेथे प्रवेश घ्यायचा असेल त्या विद्यालयात/निकेतनात) कृषि तंत्र विद्यालयात/विनाअनुदानित कृषि तंत्र निकेतनात सोबत जोडलेल्या प्रवेश प्रणाली वेळापत्रकानुसार कार्यालयीन वेळेत स्वतः राबवावी. यामध्ये आरक्षणाचे व जिल्हयाचे बंधंन राहणार नाही. परंतु उमेदवार हा विदर्भातील असावा. उमेदवाराने प्रवेशासंबंधीचा प्रवेश अर्ज (**www.mcaer.org** या संकेतस्थळावर उपलब्ध) संबंधीत कृषि तंत्र विद्यालय/कृषि तंत्र निकेतनातुन दि. १०.०९.२०१४ ते १६.०९.२०१४ या कालावधीत प्राप्त करावे. तसेच प्रवेश अर्ज संबंधीत कृषि तंत्र विद्यालय/कृषि तंत्र निकेतनाने आपले स्तरावर खुल्या संवर्गासाठी रू. ४००/– व मागास संवर्गासाठी रू २००/– आकारून दि. १०.०९.२०१४ ते १६.०९.२०१४ या कालावधीत भरून घ्यावा.

त्यानंतर दि. १७.०९.२०१४ रोजी प्राप्त अर्जांची छानणी व गुणवत्ता यादी तयार करावी. दि. १८.०९.२०१४ रोजी आपआपल्या कृषि तंत्र विद्यालय/कृषि तंत्र निकेतनात गुणवत्ता यादी प्रसिध्द करुन आपआपल्या जिल्ह्यातील प्रवेश प्रक्रिया राबविणारे घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य यांचेकडून सर्व कागदपत्रे मुळ कागदपत्रावरून दि. १९.०९.२०१४ ते २०.०९.२०१४ या कालावधीत तपासुन दि. २२.०९.२०१४ ते २३.०९.२०१४ या कालावधीत गुणवत्ता

यादीस विद्यापीठाची मान्यता घ्यावी. विद्यापीठाने मान्यता दिलेल्या यादीनुसार आपआपल्या कृषि तंत्र विद्यालय/कृषि तंत्र निकेतनात प्रवेश प्रक्रिया दि. २४.०९.२०१४ रोजी कार्यालयीन वेळेत स्वतः राबवावी. प्रवेश प्रक्रिये दरम्यान विद्यार्थी स्वतः हजर राहणे अनिवार्य आहे.

यानंतर प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांच्या घटक/संलग्न कृषि तत्रं विद्यालयाच्या प्राचार्याकडून तपासून प्रमाणित करण्यात आलेल्या याद्या आणि वर जमा झालेल्या रकमेचा (वरील प्रती अर्जदार खुला संवंर्ग रू. ४००/— व मागास संवंर्ग रू. २००/— प्रमाणे) धनादेश एकत्रितरित्या सहयोगी अधिष्ठाता, निम्न कृषि शिक्षण, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे नावे त्यांचे कार्यालयात सादर करावे.

स्वाक्षरीत/—
सहयोगी अधिष्ठाता
निम्न कृषि शिक्षण
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला.

प्रतिलीपी :—

१. मा. कुलगुरू यांचे स्विय सहाय्यक यांना मा. कुलगुरू, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे माहितीकरीता सविनय सादर. २. कुलसचिव, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहितीकरीता सविनय सादर. ३. उपकुलसचिव (वि.वि.), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहितीकरीता अग्रेषित.

४. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना सदर पत्र व प्रवेश प्रणाली वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

निम्न कृषि

शिक्षण

रिक्त जागा भरणे प्रवेश प्रणाली वेळापत्रक २०१४-१५

| अ. क्र. | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १. | अर्ज विक्री सुरु होण्याचा दिनांक | १०.०९.२०१४ |
| २. | अर्ज विक्री व सपं ूर्ण भरलेले अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | १६.०९.२०१४ |
| ३. | अर्जाची छाननी करणे | १७.०९.२०१४ |
| ४. | गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | १८.०९.२०१४ |
| ५. | कृषि तंत्र विद्यालय / निकेतनांनी विद्यार्थी गुणवत्ता यादी व विद्यार्थ्यांची मुळ कागदपत्रे त्या त्या जिल्हयातील घटक / संलग्न विद्यालयांच्या प्राचार्याकडून तपासून घेणे | १९.०९.२०१४ व २०.०९.२०१४ |
| ६. | गुणवत्ता यादीस विद्यापीठाची मान्यता घेणे | २२.०९.२०१४ ते २३.०९.२०१४ |
| ७. | विद्यापीठाने मान्यता दिलेल्या यादीनुसार विद्यार्थ्यांनी कृषि तत्रं विद्यालय / निकेतन येथे प्रवेश घेऊन हजर होण्याचा दिनांक | २४.०९.२०१४ |

स्वाक्षरीत/-

कुलसचिव

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला.